# यशोगाथा

## सई स्वयंसहाय्यता समुह माहेगाव, राहुरी

सई स्वयंसहाय्यता समुह माहेगाव, राहुरी या गटाची स्थापना दि. २५/५/२००७ रोजी झाली. गटात एकुण १० सदस्य असून मासिक बचत १०० रु आहे. गटास प्रथम अर्थसहाय्य २५,००० रुपये मिळाले तसेच दुसरे अर्थसहाय्य २ लाख रु. मिळाले. गट स्थापन करण्यापुर्वी गटाची स्थिती अत्यंत हालाकिची होती. गटातील सर्व महीला शेतमजुर म्हणुन कामांसाठी जात होत्या व मिळेल त्या रोजंदारीवर काम करीत होत्या. समुहातील महिलांची स्थिती नाजुक असल्यामुळे त्यांना वैयक्तिक पातळीवर व्यवसाय करणे शक्य नव्हते. याच दरम्यान महीलांनी स्वयंसहाय्यता गट स्थापन केला.



सुरुवातीला पंचायत समिती राहुरी यांच्याकडून २५००० रुपयांचे खेळते भांडवल गटास मिळाले. या खेळत्या भांडवलातुन गटाने धुलाई पावडर तयार करण्याचे ठरविले. यासाठी गटाला जिल्हा उद्योग केंद्राकडून धुलाई पावडर तयार करण्याचे प्रशिक्षण मिळाले. सुरुवातीला भांडवल कमी असल्यामुळे या उद्योगातुन थोड्याप्रमाणात उत्पादन मिळत होते. उत्पादन वाढविण्यासाठी बँकेत कर्ज प्रस्ताव सादर केला. या उद्योगासाठी गटाला बँकेकडून ९ लाख रुपयाचे कर्ज उपलब्ध झाले व त्यास शासनाकडून अनुदान मिळाले. त्यामुळे गटाला सदर उद्योगासाठी जास्तीचे भांडवल उपलब्ध झाले व त्यातुन गटाने उद्योगाचा विस्तार केला. सद्या गटाला महीन्याला सदर उद्योगातुन २ हजार रु. प्रति सभासद या प्रमाणे नफा मिळतो. गटातील सर्व महिला या व्यवसायात पुर्णवेळ सहभागी असतात गटातील कोणतीही महिला रोजंदारीवर बाहेर कामाला जात नाही.

गटाला सुरुवातीला उत्पादन करतांना बऱ्याच अडचणी आल्या गटातील महिलांमध्ये समन्वय साधण्याची मोठी अडचण होती. तसेच उद्योगासाठी ही जागा उपलब्ध नव्हती. या करीता गटाने एका महिलेची २००० रु. या प्रमाणे प्रति महिना जागा भाड्याने घेतली व तेथे उद्योग सुरू केला. गटाने धुलाई पावडरच्या उत्पादनानंतर त्याची बाजारपेठ म्हणून स्थानिक पातळीवर किराणा दुकानामध्ये जाऊन आपल्या उत्पादनाची माहिती दिली व या दुकानदारांना त्या धुलाई पावडरची विक्री करू लागल्या.

सध्या गटाचा हा उद्योग अतिशय चांगल्या प्रकारे सुरु असुन नफाही चांगला होतो. यातुनच त्यांनी बँकेचे घेतलेले कर्जही वेळेवर परत फेडले आहे. गटातील महिला अर्थिक दृष्ट्या सक्षम झालेल्या आहे. त्याचप्रमाणे सामाजिक दृष्ट्याही सक्षम झालेल्या आहेत. भविष्यकाळात हाच उद्योग मोठ्या प्रमाणात वाढविण्याचा त्यांचा निर्धार आहे.

# यशोगाथा

## जिजामाता महिला बचत गट सारोळा ता. जामखेड

२.५ लाख रुपयांच्या कर्जाची यशस्वी परत फेड, १ लाख रुपयांची ३ वर्षे मुदतीची ठेव व गटातील सदस्यांना ९० हजारापेक्षा अधिक रुपयांचे कर्ज वितरण, शेळी पालन प्रकल्प व नायलॉनच्या पिशव्या यातुन मिळणारा नफा वेगळा हे कतृत्व आहे जिजामाता महिला बचत गटाचे यावर विश्वास बसणार नाही पण ही वस्तुस्थिती आहे. फक्त १००० लोकसंख्या असलेल्या



सारोळा या गावातील या १० महिलांनी आपल्या परिश्रमातुन अन्य महिलांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

या गावातील लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. अनियमित व अपुऱ्या पावसामुळे येथील शेती मोडकळीस आलेली आहे. रोजगाराचे दुसरे साधन उपलब्ध नाही त्यामुळे मोल मजुरी केल्याशिवाय दुसरा पर्याय नाही अशा परिस्थितीत जिजामाता बचत गटाने एकत्र येऊन १९ सप्टेंबर, २०११ मध्ये बचत गटाची स्थापना केली. सौ. अंजना रविंद्र थोरात यांची अध्यक्ष म्हणून तर सौ. मंगल विरभद्र पुरी यांची सचिव म्हणून निवड करण्यात आली. सुरुवातीला दरमहा ५० रुपया प्रमाणे बचत केल्यानंतर आज हा बचत गट १५० रुपयांप्रमाणे बचत करत आहे. कॅनरा बँकेच्या राजुरी येथील शाखेने त्यांना बचत खात्यातील नियमितता पाहुन खेळते भांडवल म्हणून २५ हजार रु. मंजुर केले त्यात त्यांना १० हजार रु. अनुदान मिळाले. या भांडवलाचा वापर गटातील सदस्यांसाठी अंतर्गत कर्जासाठी केला व वाटप केलेल्या कर्जाची परतफेड २% व्याजा सहीत करण्यात आली.

या महिलांनी सुरुवातीला युरीयांच्या गोण्याच्या धाग्यापासुन पिशव्या बनविल्या नंतर त्यांनी औरंगाबाद येथुन तागे आणुन पिशव्या बनविण्यास सुरवात केली. त्यांच्याकडे ३ शिलाई यंत्रे आहेत. आठवड्याला सुमारे १ हजार पिशव्या तयार होतात त्यांच्या विक्रीतुन आठवड्याला १० हजार रुपयांचे उत्पन्न मिळते.त्यातुन ३ हजार रुपयांचा निवळ नफा मिळतो.

बीड, पाटोदा, आष्टी, खर्डा, जामखेड, कडा तसेच अ.नगर येथे आम्ही लेकी आहिल्येच्या या विक्री केंद्रातून पिशव्यांची विक्री करण्यात येते. त्यातुन महिलांना चांगला नफा मिळतो. भविष्यात हा व्यवसाय वाढविण्याचा गटाचा विचार आहे. त्यातुन चांगला रोजगार मिळविण्याचा गटाचा प्रयत्न आहे.

# यशोगाथा

## नागेश्वर महिला स्वयंसहाय्यता समुह

## मु.पो. भाळवणी, ता. पारनेर, जि. अ.नगर



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात भाळवणी गणात सेमी इंटेंसीव्ह पद्धतीने काम चालू आहे. भाळवणी गावामध्ये काही नवीन गट तयार करण्यात आले. त्यातील हा नागेश्वर महिला स्वयंसहाय्यता समुहाची यशस्वी गाथा. गावातील अनुसुचित जाती समाजातील १३ महिलांनी नागेश्वर स्वयंसहाय्यता समुहाची स्थापना पी.ओ.पी. पद्धतीने फेब्रुवारी २०१४ मध्ये झाली. गटाची स्थापना झाल्यानंतर गटाचे दशसुत्रीचे प्रशिक्षण झाले. या प्रशिक्षणाप्रमाणे गटाची बैठकाही झाल्या. दशसुत्री समजलेल्या या गटाने पहिल्या बैठकीपासून अंतर्गत कर्ज वाटप सुरु केले व तितक्याच नियमितपणे त्या कर्जाची परतफेडही करु लागल्या. आपल्या अडचणींसाठी गटातील महिलांना गटाकडुन महिलांना पाहिजे तेव्हा पैसे मिळु लागले. दशसुत्रीचे पालन करणाऱ्या या गटांने आरोग्य, शिक्षण व पंचायतराज संस्थांमध्ये सहभाग या सुत्रांचिही नियमित अंमलबजावणी सुरु केली. १ मे, १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर या ग्रामसभामध्ये या गटाच्या सर्व महिला १०० टक्के उपस्थित राहतात. गटाच्या बैठकीत शाश्वत उपजिवीकेवर होणाऱ्या चर्चेतुन आपण छोटे छोटे व्यवसाय करु शकतो असा आत्मविश्वास महिलांमध्ये निर्माण व्हायला सुरुवात झाली.

याच गटातील एका महिलेची ही यशस्वी गाथा.

नागेश्वर स्वयंसहाय्यता गटातील उज्वला बबन उमाप या मोल मजुरी करणाऱ्या महिला दररोज कुणाच्याना कुणाच्या शेतात काम करत असतात. आता त्यांनी पतीच्या मदतीने ४५०००/– चे सुपारी कटींगचे मशिन घेतले व यासाठी गटाकडुन १०,००० रु. चे कर्ज त्यांनी घेतले. या मशिनमधुन खाण्याच्या सुपारीचा चुरा करून या सुपारीचा गावस्तरावरगाव स्तरावर पान टपरी, मावा टपरी या ठिकाणी चांगली विक्री होते.

ही महिला साधारपणे एका दिवसात २५ किलो सुपारीचा चुरा केला जातो. तसेच प्रती किलो एकुण ३२० रु. हा उत्पादन खर्च येतो. या सुपारीची बाजारातील प्रति किलो विक्री किंमत ३६० रु. आहे. मार्केटींग स्वतःचे पती करत असल्याने त्यांना मार्केटींग खर्च द्यावा लागत नाही. त्यामुळे त्यांना प्रति किलो ४० रु. नफा मिळतो. साधारपणे महिन्यातील २० दिवस सुपारी कटींग होते. व सरासरी २५ किलो प्रति दिन या प्रमाणे महिन्याचे ५०० किलो सुपारी या विकतात. त्यामुळे मासिक उत्पन्न २०,०००/– इतक्या मोठ्या प्रमाणात या व्यवसायातुन त्यांना मिळायला लागले. या सर्वांचे श्रेय त्या नागेश्वर महिला स्वयंसहाय्यता समुहाला देतात.

# यशोगाथा

## कल्याणी महिला स्वयंसहाय्यता समुह, खांडगाव, ता. संगमनेर, जि. अ.नगर

कल्याणी महिला स्वयंसहाय्यता गटात एकूण १२ महिला सदस्य आहेत. या गटाची स्थापना सन २००८ मध्ये झाली. गटाचे प्रथम मुल्यांकन सन २००९ मध्ये होऊन गटाला प्रथम मुल्यांकनाच्या आधारे बँकेकडून रु. २५,००० रक्कम खेळते भांडवल कर्ज स्वरुपात प्राप्त झाले.



सन २०१० मध्ये गटाचे द्वितीय मुल्यांकन झाले. गटाला द्वितीय मुल्यांकनानंतर बँकेकडून दुग्ध व्यवसायासाठी संकरित गाय खरेदीसाठी रु. २,७५,००० एवढ्या रकमेचे बँकेकडून कर्ज मिळाले. गटाला मिळालेल्या कर्जातून प्रत्येक सदस्याला गाय खरेदी करण्यासाठी रु. २५,००० प्रमाणे वाटप करण्यात आले. या मधुन प्रत्येक सदस्याने प्रत्येकी एक या प्रमाणे गाय खरेदी केली. गाय खरेदी केल्यानंतर दुधाची विक्री करण्यासाठी सर्वांनी मिळुन गृहलक्ष्मी दुध डेअरीची निवड केली.

या गटातील सर्व सदस्या गृहलक्ष्मी दुध डेअरीमध्ये दुधाचा नियमित पुरवठा करतात. यामध्ये गृहलक्ष्मी दुध डेअरीमधुन गटाला दरवर्षी रक्कम रु. २५,००० रिबेट मिळतो. गटाने दुग्धव्यवसायासाठी घेतलेले कर्जाची ३० महिन्यात बँकेकडे परतफेड केली.

सन २०१४ मध्ये बँकेने या गटाची कर्ज परत फेडीचा नियमितपणा व त्यांच्या व्यवसाय याचा विचार करून गटाचे तृतीय मुल्यांकन केले. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत गटाला दुग्धव्यवसाय वाढवण्यासाठी रु. ३,००,००० इतकी रक्कम बँककेडून कर्ज देण्यात आले. या गटाचे भांडवल रक्कम जास्त असल्याने गटातील सदस्यांना गरजेनुसार अंतर्गत कर्ज ही दिले जाते. या कर्जानंतर गटातील सर्व सदस्यांनी आणखी एक-एक गाय घेऊन आपला व्यवसाय वाढवला.

दुध डेअरीच्या या व्यवसायातून स्वयंसहाय्यता बचत गट निर्मिती हे केवळ रचनात्मक काम नसून ती एक चळवळ आहे, हे या गटास पटले आहे.

# यशोगाथा

## यश स्वयंसहाय्यता महिला बचत गट खरवंडी
## ता. नेवासा, जि. अ.नगर

गटात एकूण ११ सभासद असून गटाची स्थापना १७ ऑक्टोबर, २०११ रोजी स्वर्ण जयंती स्वरोजगार योजने अंतर्गत झाली असून या गटाच्या अध्यक्षा मारीयाबाई नवगीरे या आहेत.

बचत गट स्थापन करणेपुर्वी सदरील महिला गावामध्ये रोजंदारीचे काम करून आपली उपजिविका चालवीत असत.




त्यांना नियमितपणे रोजगार मिळत नव्हता. कारण गावामध्ये शेती व्यवसाय असल्यामुळे शेती हंगामा प्रमाणे त्यांना काम मिळत असे.

बचत गट स्थापन झाल्यानंतर पाच ते सहा महिन्यानंतर गटाचे प्रथम मुल्यांकन बँकेचे अधिकारी व पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांनी केले. या बचत गटास बँकेमार्फत खेळते भांडवल रु. २५००० देण्यात आले. या कर्जाचा विनियोग गटातील सदस्यांनी त्यांच्या कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी केला. बँकेने दिलेल्या कर्जाची नियमित परत फेड केली. त्यानंतर गटाच्या मागणीनुसार गटास मोठे अर्थसहाय्य मिळणेसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षात गटाचे द्वितीय मुल्यांकन दि. १६ सप्टेंबर, २०१४ रोजी करण्यात आले. बँकेमार्फत गटाला संकरीत गायी पालनासाठी कर्ज रु. ३,३०,००० देण्यात आले. गटाने संकरीत गायी पालनाचा व्यवसाय सुरु केला व त्यापासून सर्व सदस्यांना कायम स्वरुपी रोजगार मिळाला. त्यामुळे गाटातील सदस्यांचे आर्थिक स्थितीचा दर्जा उंचावला आहे. बँकेमार्फत घेतलेले कर्जाची नियमित परतफेड केली आहे.

बचत गटास ३ दिवसाचे दशसुत्री प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे बचत गटाने सर्व संमतीने शौचालय बांधकामाचा निर्णय घेऊन शौचालय बांधलेले आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामुळे बचत गटास चांगला फायदा झाला असून गट आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे.

# यशोगाथा

## सावित्रीबाई महिला स्वयंसहाय्यता बचत गट, पिंपळगाव माळवी

सावित्रीबाई महिला स्वयंसहाय्यता बचत गट पिंपळगाव माळवी, ता. नगर, जि. अहमदनगर या गटाची स्थापना दि. १३/३/२०१४ रोजी झाली आहे. गटात एकुण १० सदस्य आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत





सेमीइन्टेंसिव्ह कार्यक्षेत्रात पिंपळगाव माळवी हे गाव येते. हे गाव नगरपासून १५ कि.मी. अंतरावर नगर-औरंगाबाद महा मार्गावर आहे. महामार्गावरच असणाऱ्या पेट्रोलपंपामागे सुमारे ४ कि.मी. आत गावापासुन लांब अशा ५ ते ६ झोपड्यांची भिल्ल समाजांची वस्ती दिसून येते. या ठिकाणाला परीट मळा असे म्हणतात. कोणत्याही प्रकारचे वाहन तेथे जाऊ शकत नसल्याने आजपर्यंत शासनाचा प्रतिनिधी या ठिकाणी गेला नव्हता अशा परिस्थितीत जेव्हा तालुका समन्वयक प्रथम या ठिकाणी गेला तेव्हा तेथील महिला त्यांच्याशी बोलण्यास खुप घाबरत होत्या जवळ येणे तर दुरच पण लांबुन देखील त्या बोलत नव्हत्या सर्व कुटूंबे दारिद्रय रेषेखालील असुनही दुर्लक्षीत होती. त्यांचा गावाशी कुठल्याही प्रकारचा संबंध आला नव्हता किंबहुना त्यांना त्याची गरजही वाटली नाही. बचत गट ही संकल्पना देखील त्यांना माहिती नव्हती.

तालुका समन्वयक यांनी या गटाच्या भेटी घेतल्या. प्रत्येक भेटीत तेथील महिला त्यांच्याशी मोकळे पणाने बोलत गेल्या. बचत गटात फसवणुक होते असे समजणाऱ्या त्या महिलांनी सावित्रीबाई नावाचा नवीन महिला बचत गट स्थापन करण्यास होकार दिला. त्यांना नेहमी समाजापासून वेगळे ठेवण्यात येत होते परंतु गट स्थापनेनंतर गटातील महीला वारंवार ग्रामपंचायतीमध्ये जाऊ लागल्या. ग्रामसभेस देखील हजर राहतात तसेच दशसुत्री प्रशिक्षणानंतर आठवडा बैठकी घेतात. या गटास सन २०१४-१५ मध्ये रु १५,००० खेळते भांडवल वाटप करण्यात आलेले आहेत. अवकाळी पावसामुळे त्यांच्या झोपड्यांचे अतोनात नुकसान झाले होते. त्याच वेळी मिळालेल्या खेळत्या भांडवलातुन त्यांनी झोपड्यांची दुरुस्ती केली. त्यामुळे त्यांना राहण्यासाठी चांगला निवारा मिळाल्याने मनापासून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे व शासनाचे आभार मानले. सुरुवातीस जवळ येऊन बोलण्यास घाबरणाऱ्या या महिला ग्रामसभेत भाग घेऊन आपल्या अचडणी सोडवु लागल्या. या महिलांना योग्य व्यवसायीक शिक्षण मिळाल्यास त्या सर्वजणी एखादा स्वयंरोजगार करतील व त्यांची जीवनोन्नती नक्कीच होईल असा त्यांनी निर्धार केला आहे.

# यशोगाथा

## ज्ञानेश्वरी महिला स्वयंसहाय्यता समुह

## मु.पो. काष्टी, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत सेमी इंन्टेंसिव्ह कार्यपद्धतीनुसार जिल्हा परिषद गट काष्टी मधील पंचायत समिती गण काष्टी येथील ग्रामपंचायत काष्टी या गावाची निवड होऊन तालुका समन्वयक यांनी ग्रामपंयात काष्टी या गावात ग्रामसभा घेऊन गामप्रवेश केला.



ग्रामपंचायत काष्टी या गावातील ज्ञानेश्वरी महिला स्वयंसहाय्यता समुहाची स्थापना १० ऑगस्ट, २००८ रोजी झाली. सदर गटास सहा वर्षे पुर्ण झाली असून या गटातील महिला दारिद्रय रेषेखालील आहेत. गटाची एकूण सदस्य संख्या ११ आहे. या गटाचे ए. डी. सी. सी. बँक शाखा, काष्टी येथे बचत खाते उघडलेले आहे. सदर गटाचे पहिले मुल्यांकन होऊन २५,००० रु. खेळते भांडवल मिळाले असून गटातील सर्व सदस्यांनी मिळून त्यांची परतफेड केलेली आहे. त्यानंतर गटाचे दुसरे मुल्यांकन होऊन गटाला २ लाख रुपये कर्ज मिळाले असून सदर कर्जाची परतफेड करणे चालु आहे.

ज्ञानेश्वरी महिला स्वयंसहाय्या महिला समुहाला जेव्हा भेट दिली तेव्हा गटाच्या सभा या अनियमित होत असून सदर गटाचे लेखे अद्ययावत नव्हते असे निदर्शनास आले. त्यानंतर तालुका समन्वयकाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानानुसार गटातील सर्व सदस्यांची बैठक घेऊन गटास प्रथम दशसुत्री समजावून सांगितली. तसेच दशसुत्रीच्या नियमानुसार बैठकीचे प्रात्यक्षिक करून दाखविले व त्यानुसार मासिक बैठकीची तारीख व वेळ निश्चित करण्यात आली.

ज्ञानेश्वरी महिला स्वयंसहाय्यता समुहातील महिला बहुतांशी मजुरी करतात. मिळालेल्या कर्जातून गट विणकाम हा व्यवसाय करत आहेत. गटातील सर्वच महिलांनी एकत्र येऊन सगळ्यांच्या सहमतीने या गटाची स्थापना केलेली आहे. गटातील सदस्यांचा अध्यक्षा व सचिवांवर विश्वास असल्याने हा गट आजपर्यंत चालू आहे. तसेच त्यांच्या गटाला ज्या अडचणी आल्या त्या त्यांनी तालुका समन्वयकांच्या मदतीने सोडविल्या आहेत.

# यशोगाथा

## सरस्वती स्वयंसहाय्यता महिला गट उंदीरगांव ता. श्रीरामपूर

सरस्वती स्वयंसहाय्यता महिला गट उंदीरगांव, ता. श्रीरामपुर, जि. अ.नगर या गटाची स्थापना दि. २ जानेवारी, २०१४ रोजी झाली. या गटाने ऑक्टोबर, २०१४ मध्ये गटाची मासिक सभा घेऊन त्यामध्ये पाणी टंचाई बाबत आपली भूमिका मांडली. याविषयावर गटामध्ये सविस्तर चर्चा होऊन सर्वांनुमते ठराव पास करण्यात आला की पाणी टंचाईवर मात करण्यासाठी



व त्यातुन गटाला आर्थिक फायदा होण्यासाठी पाण्याच्या टँकरची खरेदी करण्यात यावी. यामध्ये टँकर खरेदी करण्यासाठी लागणारी रक्कम पाण्याच्या टँकर भाड्याने देण्याची पद्धत व त्यावर आकारण्यात येणारा दर तसेच गटातील महिलांनी जर टँकरसाठी ग्राहक आणले तर त्या महिलेला देण्यात येणारा मोबदला इत्यादी बाबत निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये मावेल या आकाराचे पाण्याचे टँकर रु. ८४,९९० मध्ये खरेदी करण्यात आले व टँकर भाडोत्री देण्याचा दर रु. ५०० प्रमाणे ठरविण्यात आला. गटातील जी महिला गटाकडे टँकरसाठीचे ग्राहक आणेल त्या महिलेस गटाकडुन ७५ रु प्रमाणे मोबदला देण्याचे ठरविण्यात आले. या प्रमाणे गटाने गावातील ज्या व्यक्तिंना पाण्याची आवश्यकता असते त्या व्यक्ति स्वत:च्या साधनाने टँकर घेऊन जात असतात. लग्न समारंभ, धार्मिक कार्यक्रम, बांधकाम इ. साठी टँकर भाडोत्री देण्यात येऊन आज रोजी पर्यंत गटास १८,७०० रु. नफा या व्यवसायातून मिळालेला आहे. या पुढे गटाने आपले स्वत:चे वाहन घेणचे ठरविलेले आहे.

# यशोगाथा

## अन्नपुर्णा स्वयंसहाय्यता समुह, ता. कर्जत, जि. अ.नगर

अन्नपुर्णा स्वयंसहाय्यता समुहामध्ये एकूण १० सदस्य आहेत. यातील सर्व महिला दारिद्र्यरेषेखालील असुन या महिला मजुरी करुन आपला उदर निर्वाह करतात. या गटाच्या अध्यक्षा सौ. स्वप्नाली दिलीप काकडे आहेत. सदर गटाची स्थापना २०१० मध्ये पंचायत समिती, कर्जत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.



सदर गट स्थापन झाल्यानंतर सहा महिन्या नंतर कर्जत पंचायत समितीचे विस्तार अधिकारी तसेच जिल्हा सहकारी बँकेचे, शाखाधिकारी यांनी गटाचे मुल्यांकन केले. या मुल्यांकनामध्ये गटाला चांगल्या प्रकारे गुण मिळाले. त्यामुळे या गटाला १०,००० रु. खेळते भांडवल व १५,००० रु. बँक अर्थ सहाय्य असे एकूण २५,००० रु. बँके मार्फत कर्ज स्वरुपात प्राप्त झाले. हे मिळालेले खेळते भांडवल व गटाकडे असणारी बचत याच्या जोरावर गटाने शिपी आमटीचा व्यवसाय करण्याचे एकमताने ठरविले. या व्यवसायामध्ये गटातील सर्व महिला उत्साहाने सहभागी झाल्या. या महिलांनी कर्जत गावातच एका मोकळ्या जागेवर छोट्याश्या टपरीमध्ये आपला व्यवसाय सुरु केला.

या व्यवसायाच्या माध्यमातुन गटाचा चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाल्याने गटाला नफाही चांगला होऊ लागला. त्यानंतरच्या काळात गटाने आपल्या व्यवसायामध्ये आपल्या कामाचा दर्जा सुधारुन व्यवसायामध्ये वाढ केल्याने त्या जास्त नफा मिळवत आहेत. सध्या दिवसाकाठी या गटाला या व्यवसायातून सरासरी ११०० रु. नफा मिळत आहे. प्रत्येक दिवशी गटातील दोन महिला या हॉटेलची जबाबदारी पार पाडतात.

सध्या या गटातील कोणतीही महिला मजुरीवर कामाला जात नाही. तर त्यांचा बराचसा उदर निर्वाह या हॉटेलच्या माध्यमातून होत आहे. तसेच या गटाला दशसुत्रीचे प्रशिक्षणही देण्यात आले आहे. सध्या हा गट दशसुत्रीचे चांगल्या प्रकारे पालन करतो व विविध सामाजिक उपक्रमही गटाच्या वतीने आयोजित करण्यात येतात. त्याच बरोबर हा गट ''साई ज्योती स्वयंसहाय्यता यात्रेत'' सहभाग घेऊन आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून नफाही मिळवतो.

अशा प्रकारे या गटातील १० महिलांचे कुटुंब आज चांगल्या प्रकारे जीवन जगत आहेत.

# यशोगाथा

## नम्रता स्वयंसहाय्यता समुह

## मु.पो. एकरुखे, ता. राहाता, जि. अ.नगर

नम्रता स्वयंसहाय्यता समुहाची स्थापना स्वर्ण जयंती स्वरोजगार योजना अंतर्गत दिनांक २७ मार्च, २००६ रोजी झाली. सदर गटामध्ये दारिद्रय रेषेखालील एकूण ११ महिला आहेत. नंतरच्या काळामध्ये गटातील सदस्यांच्या समन्वयाच्या अभावाने मुळे बंद पडला. या गटातील महिला गट स्थापनेच्या पुर्वी मजुरी करत होत्या. परंतु नंतर महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियाना अंतर्गत तालुका समन्वयकां मार्फत हा गट पुन्हा सुरु करण्यात आला.

यानंतर या गटाला दशसुत्रीचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये गटाचे फायदे तसेच संघटनाचे महत्व गटाला पटल्यानंतर





गटातील सर्व महिलांनी स्वतःचा नम्रता स्वयंसहाय्यता समुह पुन्हा सुरु केला. यातून गावातील वेगवेगळ्या सामाजिक कार्यांमध्ये त्या उत्साहाने सहभाग घेऊ लागल्या.

हा गट गरिबांतील गरिबांचा असल्यामुळे त्यांचा गट पुन्हा सुरु केल्यापासून ३ महिन्यानंतर त्यांचे मुल्यांकन झाले व त्यांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अहमदनगर यांच्या मार्फत १५,००० रु. खेळते भांडवल मिळाले. या भांडवलामधून आपापल्या गरजेनुसार व क्षमतेनुसार गटातून कर्ज घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरु केला. त्यातून त्यांना थोड्याफार प्रमाणात उत्पन्नही सुरु झाले. आता या गटाला सहा महिने पुर्ण होऊन हा गट बँकेकडे आपला व्यवसाय वाढविण्यासाठी कर्जाची मागणी करण्याचे ठरविले आहे. तरी ज्या काही सुरु केलेल्या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे त्यांनी आपण पुन्हा एकदा गट सुरु केल्याचे समाधान मिळाले आहे. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहमदनगर व पंचायत समिती राहाता यांचे मनोमन आभार मानत आहेत.

# यशोगाथा

## कुलस्वामीनी स्वयंसहाय्यता बचत गट

## अकोले, जि. अहमदनगर

कुलस्वामीनी स्वयंसहाय्यता बचत गटातील सर्व महिला ह्या अकोले गावातील सह्याद्री पर्वतरांगेतील प्रवरा नदीच्या व अगस्ती ऋषींच्या पावन भुमीत डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या गावातील आहेत. सदर गटातील सर्व महिला आदिवासी व बिगर आदिवासी समाजातील शेतमजुरी व अन्य मजुरी करून उदर निर्वाह करणारे दारीद्रयरेषेखालील आहेत.




या बचत गटाची स्थापना ४ मार्च, २००९ रोजी झाली आहे. बचत गटास खेळते भांडवल व मोठे व्यवसाय कर्ज सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा अकोले यांचेकडून मिळालेले आहेत. याकामी पंचायत समिती अकोले येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करून सहकार्य केलेले आहेत.

गटांस व्यवसाय कर्ज मंजूर झाल्यानंतर गटाने आवळ्यापासून बनणारे विविध प्रकारचे औषधी उत्पादने बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या गटाने उत्पादीत केलेल्या विविध औषधी गुणधर्म असलेल्या पदार्थांना उत्तम प्रकारची बाजारपेठ उपलब्ध होणेसाठी पंचायत समिती स्तरावरून विविध ठिकाणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे मार्फत आयोजित प्रदर्शन कार्यक्रमास सहभागी करण्यात आल्याने उत्पादक मालाची जाहीरात होऊन मोठ्या प्रमाणात उत्पादक मालाचा खप होऊन गटाला आर्थिक फायदा होऊ लागला आहे.

या बचत गटाने जिल्हास्तर, राज्यस्तर व देशपातळीवरील दिल्ली येथे विविध उपक्रम, प्रदर्शन कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदविलेला आहे. बचत गटाच्या माध्यमातुन बचत गटातील सदस्यांचे आर्थिक परिस्थिती सुधारून राहणीमान उंचावण्यास मदत झाली आहे. बचत गटातील उत्पादक माल देशपातळीवर गेल्यामुळे बचत गटातील सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरणनिर्माण झालेले आहे. मालाचा मोठ्या प्रमाणात विक्री झाल्याने आपणही उद्योजक होऊ शकतो याची प्रत्येक सदस्याला जाणीव निर्माण झाली आहे. याकामी गटाच्या अध्यक्षा, श्रीमती प्रतिभा राजेंद्र सुर्यवंशी व गटाचे सचिव सौ.साधना रामचंद्र बगाडे यांनी गटाच्या संदर्भात नेतृत्व करून गटाचा उत्कर्ष व विकास केला आहे.